


# श्री साई ध्यास

[ गीत संग्रह ]



कवि - हनुमानसिंह ठाकोर

९९६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १२९४

REFBK-0011252
REFBK-0011252

बालमित्र साईनाथ भजनी मंडळ प्रकाशन

# श्री साई ध्यास

(गीत संग्रह)

स्थळप्रत.
मराठी
अनुक्रम.... २००८०
क्रमांक .....१२८४
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११२५२
REFBK-0011252
REFBK-0011252

कवि
हनुमानसिंह ठाकोर

किंमत ५० नये पैसे

प्रकाशक
श्री. हनुमानसिंह ठाकोर
बालमित्र साईनाथ भजनी
मंडळ प्रकाशन
७६३, कसबा पेठ, पुणें २.

आवृत्ति पहिली १९६०
सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक
श्री. प्र. श्री. काकडे
अरुणोदय प्रिंटिंग प्रेस
सोलापूर.

# ऋण निर्देश ~

आमच्या या ‘ श्री साई ध्यासाला ’ अनेकांची मदत झाली आहे. मुख-पृष्ठाच्या ब्लॉकचा सर्व खर्च सौ. कालिंदी वासुदेव ताडफळे यांनी आपणहून दिला आहे. श्री. मधुकर द. जोशी ( संपादक समता ) यांची मदत आणि मार्ग-दर्शन म्हणजेच आमच्या साईध्यासाचें मूर्त स्वरूप आहे. श्री. रंगनाथ पाचंगे, श्री. मधुभाऊ बावडेकर, ४८४ नारायण पेठ, पुणे यांचाही उल्लेख केल्यावाचून राहावत नाहीं. सोलापूरच्या अरुणोदय प्रिं. प्रेसचे श्री. बाळासाहेब काकडे व श्री. दत्ता काकडे यांनीं हे पुस्तक वेळेवर व सुबकरितीनें छापून दिलें. शेवटीं जाहिरातदारांनीं आपल्या जाहिराती देऊन मदत केल्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत.


**प्रकाशक.**



# समर्पणपत्रिका

आई – माझ्या जीवनांत अनेकाविध प्रसंग मी अनुभाविले, तुझा प्रेमळ आशीर्वाद सदैव माझ्या मागे होता. आज यावेळीं तू नाहींस, याची जाणीव मला सदैव होत आहे. आता माझा आधार साईमाऊलीच आहे. मला त्या विश्वजननीच्या भजनांत जो आनंद होतो त्यांत मी सारी दुःखें विसरून जातो, आणि त्या आनंदातच भजनलहरीतच माझा शेवट होवो, अशी मागणी तुझ्याजवळ आणि साईमाऊलीजवळ करीत आहे.

भजनाच्या आनंदांत जे कांहीं वेडेवांकडे शब्द - त्याला मी काव्य म्हणतो - बाहेर आले. त्या शब्दरुपी पुष्पांचीं ओंजळ मोठ्या भक्तीभावनेनें मी तुझ्या चरणकमलीं वहात आहे.



दादा



श्रीसद्‌गुरु गजाननमहाराज गुप्ते (नाशिक)
यांचे परमशिष्य

योगीराज श्रीदादा (ग. रं.) आंबेकर

# यांचा आशीर्वाद

सोऽहम्

हनुमानसिह ठाकोर,

अनेक उत्तम आशीर्वाद,

आपला गीतसंग्रह प्रकाशित होत आहे ही आनंदाची बातमी कळल्यापासून मी माझ्याकडे येणाऱ्या सर्व सुहृदांना आपल्या गीतांचें श्रवण करण्यास सांगीतले आहे.

व्यवहारांत जो यशस्वीरित्या वागु शकतो तो परमार्थांतहि आपोआप अधिकारी होतो. त्याला जप, ध्यानधारणा, योग-याग करण्याची जरूरी नसते. आमचे सद्‌गुरुनाथ श्री गजाननमहाराज गुप्ते नेहमी म्हणत असत 'तुम्हीं प्रपंच चांगला करा, तुमचा परमार्थ आमचेकडे लागला' महाराजाची ही आठवण येवढ्यासाठीं देत आहे कीं, आपण आपल्या आयुष्यांत अत्यंत सरळपणानें वागून अनेकांना गुरुभक्तीचे महत्व आपल्या भक्तीगीतांतून पटवून दिले आहे. तुमचा परमार्थ वेगळा नसून यांतच समावला आहे. आपल्या यशांत आपल्या बालमित्र साईनाथ भजनी मंडळाच्या बालगोपाळांचा फार मोठा वांटा आहे. त्यामुळे संसारांत यश आणि परमार्थांत आनंद आपल्या वांट्याला आला आहे. हे या प्रसंगीं नमुद करावेसे वाटते.

सद्‌गुरु श्रीगजानन महाराजांचे चरणीं आपणांस व मंडळास शुभ चिंतितो. सर्वांस आशीर्वाद.

आपला - दादा

# बाल मित्रांची रे भोळी सेवा –

*(अल्प परिचय)*

बालमित्र साईनाथ भजनी मंडळाची स्थापना १९५२ साली श्री. हनुमानसिंह ठाकोर यांनीं श्री. रामभाऊ कुलकर्णी [ ड्राइंग शिक्षक दापोली ] यांच्या सहकार्यानें केली. गणपती उत्सवांत लहान बाल-बालिका मेळ्यांतून नाचतांना आचकट विचकट गाणी म्हणतात. सरकारी कितीही नियंत्रण घातले गेले तरी त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. हे पाहुन बालांच्या मनावर सुपरिणाम व्हावेत, त्यांच्या जीवनांत या वयापासून सुसंगत सत्सहवास, सद्वचनें यांची जोड मिळावी या एका उद्देशानें बालमित्र साईनाथ भजनी मंडळाची स्थापना करण्यात आलीं. श्री. ठाकोर हें बालांमध्यें रमणारे आणि मनाचे कोवळे असें साईभक्त आहेत. साईबाबांचीच भजनी मंडळी तुम्हीं कां स्थापन केली असें विचारले असतां ते म्हणाले "श्री साईबाबांचे भक्तिपीठ जातिनिरपेक्ष आणि सर्व धर्म समुच्चय असें आहे. सर्वांना तेथें मुभा आहे." बालमित्र साईनाथ भजनी मंडळांत सुरवातीला दहा-बारा बाल-बालिका होत्या आज ही संख्या २५ चे वर गेली आहे. ज्ञानोबा, तुकाराम, जनाबाई, एकनाथ महाराज, यांचे अभंग आळविणारीं बालकें श्री. हनुमानसिंह ठाकोर यांच्या प्रासादिक लेखणीतून उतरलेली भजनें मोठ्या तल्लीनतेनें गात असतात, भावगीतांच्या, सिनेमांतील पदांच्या चालीवरील भजनें तयार केली असल्यामुळें मुला-मुलींच्या मुखातून प्रसिद्ध अशा सिनेमाच्या चाली, पण भजन साईबाबांचें, यामुळें भजनी मंडळाला फारच प्रसिद्धी मिळाली.

आतापर्यंत शहरांत ठिकठिकाणी, उत्सव, पुण्यतिथी, सत्य-नारायण, गुरुवार, एकादशी अशा निमित्तानें १६०० च्या वर भजनांचें कार्यक्रम झाले आहेत. संत कवि श्री. दासगणुमहाराज, नाशिकचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........ दि ........
क्रमांक ........ नों दि ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99242
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

## वंदन करुं आजला

(चाल:– नमन)

वंदन करुं आजला सद्गुरु चरणीं
दत्त दिगांबर अवधूत भजनी ।। धृ ।।

संकट समयी, ध्यास तुझा रें ।।
लागे मजला आज तुझा रें ।।१।। वंदन ।।

दीन दुबळयांचा तूं कनवाळू ।।
देई दर्शना नको अंत पाहू ।।२।। वंदन ।।

# गाईन गीते मी दत्तराया

(चालः- घट डोईवर घट कमरेवर)

रुप मनोहर शोभे पितांबर गाली हंसरा दत्तराया
गुरुराया रे ऽ ऽ ऽ ऽ ऽ रुप ॥ धृ ॥

विसरुन वैभव यावें भक्तास्तव ॥
पाजून अमृत शांति ही देवून,
शुद्ध कराया, माझी काया ॥ दत्त ॥१॥

सद्‌गुरु म्हणता नाथ भगवंता ॥
दास तुमचें नामे वदता,
चरणी येवून, लीन व्हाया दत्तराया ॥२॥

कृपेनें तुमच्या, लागे गोडवी ॥
प्रेम भरानें वेडी वाकुडी,
गाईन गीतें मी दत्तराया ॥ गुरुराया ॥ ३ ॥

# कृपादान संतांचे हे

( चालः– आभाळीचा चांद)

शिरडीच्या सांईनाथा तूंच मायबाप माझा ।।
बैसोनिया द्वारकामाई धुनीच्या समोर ।। धृ ।।

दारोदारी फिरे बाबा, मागी रे तुकडा बाबा ।
नाहीं कुणी ओळखिला अंतरीच्या ठावा ।

परब्रम्ह योगेश्वरा शिरडीच्या नाथा बाबा ।
झिजविली भक्तापायी किती वर्षे काया ।
काय सांगू कोणापुढें मज नाहीं अधिकार ।।१।। बैसो. ।।

किती ओढ माझ्या लावलीस मनीं बाबा ।
तुझ्याविण आतां ऽऽऽऽऽ नारे मुखी वाणी ।

कंठ दाटूनिया आला उभि त्रिगुणात्मक माया ।
ऐसे रुप दाखवूनी शिरडीस राहतां गेला ।
कृपादान संतांचे हे हनुमंता खरोखर ।।२।। बैसो. ।।

## सद्‌गुरु सांई शिरडीच्या देवळांत

(चालः– नाच रे मोरा अंब्याच्या बनांत)

सद्‌गुरु साई शिरडीच्या देवळांत ॥
सद्‌गुरु साईनाथ ॥ धृ ॥

भक्तांना थारा मिळतो रे ॥
हरे राम हरे राम जपतो रे ॥
टाळ घेतां हाती मुखीं नाम गाती ॥
भजनी तल्लीन नाथ ॥१॥ सद्‌गुरु. ॥

घरोघर आरती करती रे ॥
मागोमाग बाबांची साऊली रे ॥
भाली गंध लावू विणा हाती घेऊ ॥
मृदुंग करितो साथ ॥२॥ सद्‌गुरु. ॥

भजनाची गोडि मला लागली रे ॥
भक्त तुझी सेवा करिती रे ॥
आनंदानें घेऊ नाम सांईनाथ सांईनाथ ॥
प्रार्थने आळवितो नाथ ॥३॥ सद्‌गुरु. ॥

## आठा दिवसाची वारी करा रे . . .

(चाल:– एका सुरांत घुंगरु बोले)

आठा दिवसाची वारी करा रे वारी करा ।।
चला चला हो सांई मंदिरा, हो गुरु मंदिरा ।। धृ ।।

वेष बाबांचा फकीरा परी रे, फकीरा परी ।।
जणू दिसे अनाथ भिकारी, अनाथ भिकारी ।।
शिरडी गांवाला त्यांच्या दारा, रे, त्यांच्या दारा ।।१।। चला. ।।

हिंदू लोकांचा बाबा सांई रे बाबा सांई ।।
मुसलमानांची मसजीद माई, हो मसजिद माई ।।
मनोभावानें पाय जा धरा, रे पाय जा धरा ।।२।। चला. ।।

कुणी केव्हांही जा गुरु पाही ।।
रे तुम्हा पाही ।।
घडें काशी नी पंढरी दोन्ही ।।
रे पंढरी दोन्ही ।।
दिल्या जन्माचं सार्थक करा ।।
रे सार्थक करा ।।३।। चला. ।।

# धन्य हो भाग हमारे

(चाल:- हम है तो चांद)

धन्य हो भाग हमारे, संतोंके वो संग किनारे ।
भक्तीसे ग्यानको बढाना, कुछ नही सवाल दुजा रे ।। धृ ।।
आ – आ – आ – आ.

पिंजरा है ये चलता फिरता, पापोसे डूबा रहता ।
बुझ जायेंगी एक दिन जलती, फिर फिर ओ जनमको आता ।
धन्य हो भाग हमारे ।

छुटकारा जब है तुम्हारा, हरिनाम जपों मुखद्वारा ।
भक्तीसे ग्यानको बढाना, कुछ नहीं सवाल दुजा रे ।।१।।
धन्य हो भाग हमारे ।

वो सद्‌गुरु सांईका कहना, सब भरोसा मुझपर रखना ।
एक बार मेरे पास आना, बैठा हुं मै शिरडीमे ।
करते उपदेश सांई रे तुम तो है मालिकके प्यारे ।
भक्तीसे ग्यानको बढाना, कुछ नहीं सवाल दुजा रे ।।२।।
धन्य हो भाग हमारे ।

जो कोओी मांगे वो मिलेंगा, निष्ठा और सबूरी ले लेंगा ।
हम तो अजमाये हाँ नजारे, हनुमान चरणों के सहारे ।
धन्य हो भाग हमारे, संतोंके वो संग किनारे ।
भक्तीसे ग्यानको बढाना, कुछ नहीं सवाल दुजा रे ।।३।।
धन्य हो भाग हमारे ।।

# प्रेमांकित हा सांई माऊलीचा

(चाल – बिहार मिश्रीत)

जा ऽ ऽ ऽ ऽ जा मंदिरी बाबांच्या जा ऽ ऽ ऽ
शुद्ध भाव ठेवूनी ऽ ऽ ऽ ऽ शुद्ध भाव ठेवूनी ॥ धृ ॥

पाहतील मज तुज पुत्र भावनेनें । हरी ॐ हरी ॐ मंत्रूनी ।
मंदिरी जा ऽ ऽ ऽ शुद्ध भाव ठेवूनी ऽ ऽ ॥१॥ मंदि.

नित्य विवंचने भक्तांच्या तूं । पाजी अमृत नकळत रे तूं ॥
प्रेमांकित हा सांई माऊलीचा । प्रसाद मिळतो निज भक्तीचा ॥
गुरुचरणी वाहुनी । मंदिरी जा ऽऽऽ ऽ शुद्ध भाव ठेवूनो ॥२॥

(चाल बदलून)

गुरु माऊलीविण कोण करी माया ।
साध्या कराया सेवा आणि पाया ।

मानव जन्मा तुझ्या कृपेनें । हनुमंता दिधला पुर्वसुकृतानें ॥
दिला आनंद प्रतिदिनी आम्हांला हां ॥
दिले नयन उघडूनी कृपाळू हां ।
शद्ध भाव ठेवूनी ऽ ऽ ऽ शुद्ध भाव ठेवूनी ॥३॥ मंदिरीं. ॥

# तुझ्या भजनांत तल्लीन झाले

(चाल – तुझ्या मुरलीनें)

तुझ्या भजनांत तल्लीन झालें
हृदयाचे बोल काढीलें, काढीलें साई ।। धृ ।।

नाही पूजा तुझी केली ।
नाही सुमनें अंगारिली ।
मुखे नामें उच्चारली ।
हृदयाचें बोल काढीलें ।।१।। का. ।।

माय बापा माझें साई
भेद नाहीं तुझें ठायी ।
शिरडी जाता द्वारकामाई ।
हृदयाचे बोल काढीले ।।२।। का. ।।

धूनी बाबा सांगे आता ।
पाठी आहे काहीं चिंता ।
तुझी माया ही भगवंता ।
हृदयाचे बोल काढीले ।।३।। का. ।।

धन्य झाले प्रेमे अजला ।
पेटविले मी सांज वातेला ।
जोडून कर साई माऊलीला ।
हनुमंता गीत गोविलें ।।४।। गो.।।

# साई भक्तिचा भुकेला

(चाल – जो आवडतो सर्वाला)

कोण संभाळतो आम्हांला, साई भक्तिचा भुकेला ।।धृ।।

पायी ठेवून मस्तक कोणी ।।
श्रद्धेने जो सेवा करुनी ।।
आळवितो कां सतत अर्जुनी ऽ ऽ ऽ
शिरडीच्या साई माऊलीला ।।१।।

देऊनी उदी आपूल्या हाती ।।
दु:खी जनांना कां हो भीती ।।
शिरी हस्त त्यांच्यासाठीं ऽ ऽ ऽ
फुटे पान्हा साई माऊलीला ।।२।।

गुरु भक्तिचे कथितो वर्णन ।
अंतरिं घाला तुम्हीं विरजण ।।
हनुमंतानें घेवूनी अनुभव ऽ ऽ ऽ
सुखवियले संसाराला ।।३।।

ग्रं. क्र. ९९२४२

## विठ्ठल पहा शिरडींत

(चाल – लौटके आ)

विठ्ठल हा ... विठ्ठल हा ... विठ्ठल हा ... ।।
हा विठ्ठल पहा शिरडीत, घरोघरी भीक्षा मागत हो ।
त्यानें पेटविले रें धुनीस, घरोघरी भीक्षा मागत हो ।।धृ।।

हा विठ्ठल ...

दळण दळतो सारें, करितो भजन न्यारे,
अल्ला हो मालिक तुम्हीं पहाना ।
गंगा वृद्ध ही जमुना पवित्र ती, चरणी लोटांगण राहिलीना ।
तूं ही दाखविलेस भक्तांस, घरोघरी भीक्षा मागत हो ।।१।।

हा विठ्ठल ...

पेटविली तूं ज्योती, झटकली हो छाटी,
पाण्यानें दीप उजाळला ।
वाघ्याच्या मुरलीला, डोळ्यानें दाखविला,
सुटकेचा निर्वाळा दिसला,
ही तुझी रें माया सांई, हनुमंत चरणी मागत हो ।।२।।

हा विठ्ठल ... ।।

# आन वाहिली हनुमंतानीं

(चाल – ज्योत दिव्याची)

सांई मुखींची अन्य भाषणें, नित्य ऐकण्या अमृताहूनी ।
गोड वाटे तृष्णा आटे भूक लागेना ह्या छंदानी ।।धृ।।

एके समयीं करीत चाकरी ।
टांगा हाका शाम लवकरी ।
उदी मुली ते देवून यावे ।
अडचण प्रसुती कळा लागोनी ।।१।। सांई. ।।

उपासनीनी वेद मंत्रिले ।
मशिदी येवून वस्त्र उतरिले ।
नजरा नजरें अंकूर फुटलें ।
जारे बैसी तूं आवरोनी ।।२।। सांई. ।।

हृदयी ठसले बोल सांईचे ।
संसार सागरी बहू मोलाचे ।
नाम जपारें सांई सद्गुरुचें ।
आन वाहिली हनुमंतानी ।।३।। सांई ।।

---



... ग्रंथालय, ठाणें. स्थळप्रत.

# कोअी हरिनाम गावे

(चाल – है मालिक तेरे बंदे हम)

सांई चरणोंका पावो आधार ।
नैया लगती है नदियाके पार ।
कोअी हरिनाम गावें । और पूजन पावे ।
प्रेमी भक्तोंका भरा दरबार ।। धृ. ।।

मेला संतोका जो चल रहा। दुनियाको जो बतला रहा।
दिलसे भक्ति करो । सेवा धरम स्मरो ।
ओही रहेगा अपना जमा ।
किया करम तूने ये जनम, छुटकारा मिलेंगा अेकदम ।
कोअी हरिनाम गावे ... ।।१।।

साई बाबा का जो महिमा । भुके पिडी मन कामना ।
अल्ला भला करे। भगवान भला करे ।
लाखो गरिबोंको इतला दिया ।
बाबा चरणोंसे यही माँगना । तेरी माया मेरी याचना ।
रहे प्रेम भरी । और श्रद्धा सबूरी ।
हमें डुबनेसें तूहीं बचा ।
कोअी हरिनाम गावे — ।।२।।

# वासना धरूनी कांरे जीवा

(चाल – कळेना अजुनी माझे मला)

वासना धरुनी कां रे जीवा ।
जगी कां कोण सुखी झाला ।। धृ. ।।

परमार्थ केला ज्या भाविकांनीं ।
मुखी वदले, मी मी म्हणूनी ।
काय मिळाले धर्म हा करुनी ।
घेई वाहूनी याच देहाला ।।१।।

नका ठेवूं भेद अंतरी ।
पाहूं जाता हेच खरोखरी ।
आत्मा जो परमात्मा श्रीहरी ।
ह्या देवाचा विसर मनाला ।।२।।

सांईनाथानें मशिदी बैसून ।
अंतर ज्ञानें दिधले सांगून ।
नाम जपारें महिमा जाणून ।
अन्यन ठावें हनुमंताला ।।३।।

## गाओ संत महिमा गाओ

(चाल – बोलो, बोलो, जय जय बोलो)

गाओ गाओ सब दिल भरकर
गाओ संत महिमा गाओ,
गाओ साई महिमा गाओ,
भेद न उनके पास न कुछ हो,
प्रेमके द्वारा गुण गाओ ।।धृ।।

ढलती है दुनिया नाश जो होता, ना डरते है नरनारी ।
अुन्हीको समझाने फिर आती, वोही संतोंकी फेरी
तुम क्या जानें अुन्होकी करामत, भूल पडी है सारी ।
जिस भक्तोने भेदको पाया, अुसी ध्यानसे जाओ ।। १ ।। गाओ.

दत्त प्रभुका अवतार मनोहर, श्रीपाद वल्लभ बोलो ।
माणिक प्रभुजी, स्वामी अक्कलकोट, आँखियाँ अपनी खोलो ।
वोहीं प्रभुजी, वोही स्वामिजी, जैसा मनमें बसा लो ।
जैसी महिमा नजरमें आवें, साई सद्गुरु पाओ ।।२।। गाओ.

साईबाबाका नाम जो लेता, संकटमे वो तरता ।
कुछ जरुरत नहीं, कोअी भगवानकी, सद्गुरु मेरा त्राता ।
देखा नही तो देखकर लेना, भरोसा कम नहीं होता ।
हनुमान की तो यही पुकार है, सांई भजन गाओ ।। ३ ।।

# उभा ठाकिला युगें युगें

(चाल – बिखर गये)

शिरडीमध्यें अवतार जो विठ्ठले, दाखविला की कलियुगें ।
जन्म नाही मरण कशाचे, उभा ठाकिला युगें युगें ।
सावळी मूर्ति दिसे निर्विकार ।। धु ।।

मशिदी बैसला संत, कशाचीच ना भ्रांत ।
भक्ता सांगे करा नामोच्चार ।। १ ।। सा.

मोक्ष पावेल जो नाम जपे, स्वर्गी मिसळेल देवादि रुपें ।
भक्तीचा मार्ग जो हा, आत्मशांति पावेल हा ।
मंत्र सोपा करी अंगिकार ।।२।। सा.

साईनें चमत्कार दाखविला,
अभिमानाचा कांटा उपटिला ।
द्वारकामाईत जा, भेदाभेद नाही दुजा ।
हनुमंत करी जयजयकार ।।३।। सा.

# सांई चरणोकी बंदे धूल

(चाल – तेरे सूर और मेरे गीत)

सांई चरणोकी बंदे धूल ।
बिना तकदीर कभिना भूल ॥ धृ ॥

झुटे मायामें क्यूं डुबता रहा
धन दौलत को पा के उंचा रहा
अखिरमे कोई न साथ चले
मगर तू आंखोका अंधा रहा
ये काले ढगियामें तेरा दिल ॥१॥ ——— बिना.

प्रणाम करते भाई भक्तोसे हम
आत्माको मानो परमात्मा जो तुम
ओही छुटकारा मिलता है
साधु संतोने पूजा मंत्र सोऽहं :
हनुमान भी है उसीमे सामिल ॥२॥ ——— बिना.

१२०० शेतकऱ्यांची सहल
यशस्वी करून दाखविणारी
एकमेव संस्था

# बावडेकर आणि कं.

## ४८४ नारायण पेठ

लोखंडे तालमीजवळ, पुणे २

फोन नं. ७३६९

मुंबईस जाल तेव्हां -

स्वच्छता, सुरक्षितता आणि
स्वादिष्ट भोजनाकरितां

# ॲंपायर हिंदु हॉटेल

बोरीबंदरसमोर, मुंबई

येथेंच रहा.

फोन नं. २६२७८९.

'साई – आवाज'

रेकॉर्ड लायब्ररी

आणि

लाऊडस्पीकर सर्व्हिस

पत्ता : १६४ नारायण पेठ,
संभाजी पुलाजवळ, पुणें २.

प्रो. शिरसट अँड चव्हाण

शा. सुमेरमल
जसाजी
भन्साळी

निवडक, धान्याचे
ठोक व किरकोळ व्यापारी

पत्ता : ४६४ नारायण पेठ, पुणें.

# शिर्डी जाकर देखो

(चाल – मैं नशेमे हूँ)

जूलूम करोना किसीपर साईनाम लो कहकर
मगर ये उन्हे बता दो सद्‌गुरु बीना कुछ न हो ॥ धृ ॥
चलता मंदिर पूज लेना मैं खुशीमें हूँ
दिलका भटकना क्यूं तडफना मै खुशीमें हूँ – चलता मंदिर
शिर्डी जाकर देख लेना बाबा का मंदिर
भेद कोई करते है क्या देख जा घर घर
ये ही है संतोकी करामत मैं खुशीमे हूँ ॥१॥
दिलका भटकना क्यूं तडफना मैं खुशीमे हूँ । चलता मंदिर...
जल रही है धुनी कब की ना जले आजकल
जल रहा दीपनंदा ना कोई हलचल
धन्य हो साईका महिमा मैं खुशीमे हूँ ॥२॥
चलता मंदिर ...
क्या सुनाऊ शान गुरुकी तुहि अजमाले
पर सबूरी कर तो लेना ये दुवा ले ले
हनुमान कहता भूल न जाना मैं खुशी मे हूँ ॥३॥
चलता मंदिर ...

# गोदावरी किनारे

(चाल – कवाली)

आज क्या शिर्डीमे चलता है, चलता है, आज क्या
शिर्डी मे चलता है, सांईबाबा वहा बैठे है ॥ धृ ॥

सुबह होती ही द्वार खुलता है, सारी नगरीमे दिये जलते है ।
आरतीका समय धडकता है, मंदीरमे भीड जो लगती है ।
नरनारी बडे खुषी होते है, एकसाथ गीत गरजते है ।
सांईनाथ गरीबोंका वाली है, जो भक्त अजमाये ! तारीफ है ।
ऐसा जो मंदर भारतमे तुम, गोदावरी किनारे
क्षेत्रमे घूम ऽ ऽ ऽ ॥१॥
आज क्या शिर्डीमे. ॥

देखो जाकर क्या ! जुल्लुस है, ! हर धरमके लोग जमते है ।
फुल गुलाबके, अत्तर सुवासका, रोजाना गलफ नये किसमका ।
पुजा चलती कहीं किमतकी, धुप लोबन छाल चंदनकी ।
प्रसाद और पेढा ढीग नरियलकी, लाही होती जवार शक्करकी ।
बच्चे जवान और बूढे है, कोई देखत चरित्र पठण हैऽऽऽ ॥२॥

आज क्या शिर्डी में. ॥

सद्‌गुरुको भोग लगाते है, पचपकवानसे वो भरपूर है ।
बाबाके ओर रख्खा करते है, बाद भक्तगण खाना लेते है ।
क्या कम है बाबाके वतनमे, जब खुशियां दिल भरा मायामे ।
नही पता यूँ शाम ढलती है, रात मैफिल जब चमकती है ।
शहेगान, युगलगान, होते है, हनुमान भजनमे
रंगीन है ऽऽऽ ।। ३ ।। आज क्या शिर्डीमे ।।

---

## बाबांची शिरडी

(चाल – इंद्रायणी कांठी)

गोदावरी कांठीं बाबांची शिरडी,
बैसली माऊली धुनिपाशी धुनिपाशी ।। धृ ।।
जडजीवासाठीं, घेतला हा जन्म,
उद्धरीले जन, उपदेशे उपदेशे ।। १ ।।
भक्तासाठीं धांवे दळुनि दळण,
घालविले रोग चमत्कारे चमत्कारे ।। २ ।।
कोणी मागें पोटीं बाळाची उणीव,
पुरवित त्यातें वर्षाकांठीं ।। ३ ।।
सांईनाम घेता संकटें जातील,
विनवित बोल हनुमंताचे ।। ४ ।।

(चाल – हमे तो लूट लिया)

हरी ओम् मंत्र दिया, शिर्डिके सांई बाबानें ।
भोले भाले सन्तोने, सिधे साधें भाषामें ।। धृ ।।
शिरडीमे आकर और रह गया मसजिदमें ।
साथ किसीको लाया नही, भटकता जंगलमें ।
एक मुशाफिर तडफ रहा, मांगता है जबरी सें ।
उसीको देखके बाबानें कहां मोहबतसे ।
तो हसते खडा हुआ बाबा चल दिये बागिचेमें ।।१।। हरी ओम्–
वही बात चल रही घर घर पूछ जाये ।
दुर दुरसे मिलनेको भाग भाग आयें ।
तडफता इन्सान जो एकबार कहता जाये ।
भजन हरीनाम जो कभी भी भूल ना जाये ।
धुनी जो जलाई बाबा पापीको तरना चाहें ।
वो खुली रखी दिवारे, तुम चरणोंके पास जाये ।।२।। हरी –
जलते है पानीके दिये भरकर जला देते है ।
दर्शन भगवानका साकार दिखा देते है ।
कोओी आंखोंका अंधा रोटीका भूका जाता है।
उन्हे तो मालिक भगवान संभाल लेता है ।
किसीको कम नही एक बार शिरडी जानें से ।
मांगता जो मिलता जब साईनाम लेनेसे ।
बाबा हयाती तुम्हें चमत्कारोंसे चमका कर बितायें ।
हनुमान हमेशा ये हीं कहेगा हम तो
सांईभजन गायें ।।३।। हरी ओम् मंत्र ––

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्था
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## नकळत प्रचिती येते —

(चाल:– चंद्र पहातां)

साई पदावर चित्त स्थिरावुन सतत नाम जो घे ऽ ऽ तो
तयासारिखे सुख बा नाही देहभान विसरून जातो ।।धृ।।
अरे भजनानंद खऱ्या भक्तीची सांगड घालुन देतो रे ।।
हाती मंजिरी साई बाबांची छबी समोरी ठेविलीं रे ।
धुप निरांजन माळ फुलांची सुवासिक तो गंध ।।
प्रसंग श्रोते येऊनी बसती तया ऐकण्या छंद ।।१।।
दगडावरती बसे ऽऽऽ माऊली उपदेश करी खरा ऽऽऽ खुरा ।
मानवतेचा खरा पूजारी तोच माझा देव बरा ।।
पूर्व सुकृता आम्हां मिळाले शिरडीचे दैवत ।।
तो दरवाजा खुला भक्तांना नाही दलाली हो ऽऽऽ त ।।
आठवण ठेवा सबूरी धरावी हा बोध साईचा घ्या तो ।
तया सारिखे सुख बा नाहीं देहभान विसरून जा ऽऽऽ तो ।।२।।
कलीयुगी जो जन्म घेतला नव नारायण प्रभू ऽऽऽ नें ।
साई नामे ओळखिला मी संत ऽ ऽ चरण हनुमंताने ।।
करावी सेवा साईबाबांची हृदयी घरूनी पहा तें ।
सद्विवेक बुद्धी आचरण ठेवा काय कमी हो त्यां ऽऽऽ ते ।।
देईल साई कृपादान मज तूंच ठरव हे नाते ।
सत् संग योगे ज्ञान तयाते, नकळत प्रचिती येते ।।३।।

---



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 99242

**श्रीसांईके लगन में —**

(चालः– पहले मोहब्बत) (कवाली)

किसी चिजकी कमी है साई तेरे लगनमें
तनमन मेरा भरा है साई तेरे भजनमें ।। धृ ।।
नाम तेरा सुन रहा था कोअी भक्तोंके दरबारमें
बैठ बैठकर ध्यान लगाया बाबा खडा हुआ सामनें ।।१।।
धुनि जो जलाई तुमने दुःखीयोंका आसरा
फाता किसिसे पढवा लिया काया लगी है कापने ।।२।।
परब्रम्ह आपको कहते बाबा, हमेशा आपका साथ हो
चरण सेवा करनें दो मुझको, सद्गुरु मनाया है तुमको ।।३।।
जनम जनमका फेरा फिरता साथी कोई नही हैं
हनुमान तुम्हे कहता बाबा रखना नही मुझे गफलतमे ।।४।।

★ ★ ★

**आमुची सांई गुरु माउली --**

(चाल – ज्ञानेश्वर माऊली) भैरवी

माऊली, गुरु माऊली, आमुची सांई गुरु माऊली
धांव घेई भक्तांच्या घरी । नित्य चाले जिथे आरती । आमुची. ।१।
जळे धुनी रात्रंदिवस ।
नंदादीप असें तेवत ।
आजही द्वारकामाईत ।। २ ।। आमुची. ।।

○ ● ○

# बाल मित्रांची रे भोळी सेवा

(चाल:– सोनियाच्या ताटीं, उजळल्या ज्योती.)

गुरु चरणापाशीं, कापूराची ज्योती ।
लाविली भक्ती भावा रे ।
बालमित्रांची रे भोळी सेवा ॥धृ॥

धुप चंदनाची, धुनी बाबांची ।
नंदा दीप जळे, ज्योत तुपाची ।
अशा शिरडीच्या, मंदिरी भेटला ।
भक्तांनी घेतला धांवा रे ! बालमित्रांची रे – ॥१॥

गोदावरी कांठीं, भजनाची दाटी ।
टाळ मृदुंगांचा, नाद आभाळीं ।
नाथ पंढरीचा, विठ्ठल भेटला ।
बोबडे गातो मी देवा रे । बालमित्रांची रे – ॥२॥

आळवितो बाबा मी सांज सकाळी ।
दया करा पापी भक्तां संभाळीं ।
दास चरणाचा मागे रे तुजला ।
मायेचा अंतीम ठेवा रे । बालमित्रांची रे – ॥३॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## दया करा सांई –

दा. क्र. ११२५२

(चाल – भैरवी)

विनंती करुं प्रभू चरणीं । चरणीं ।
येइ ईशा धांवोनी ।। धृ ।। विनंती ।।
प्रलयकाल होई जगती ।
प्रस्थापी सुखशांतीं ।
तुजविण मज कोण तारी ।।१।।
विनंती करुं प्रभू चरणी –

२२

REFBK-0011252

(चाल – भैरवी)

झालों आभारी तुम्हां सज्जनांचा ।
काय वर्णू मी बाबांची गाथा ।। धृ ।।
साईनाथाने दिधलीं ही प्रेमाची रे चाकरी ।
चरणासी राहूं । भक्तीभावे ।
गोड नाम गातो संगीतानें ।।१।।
आतां लोटूं नका दुरवरी ।
मग जाऊं कुणाच्या दारीं ।
हनुमंता दया करा सांई ।
घडो सेवा माऊलीच्या पायीं ।।२।।